**एकटेपण**

आजची रात्र वेगळी, ना कुणी सोबतीला
मनातही विचार ना, आज खास कुठला ॥ १ ॥

आजवर ना दिला, वेळ एकदाही स्वत:ला
म्हणोनीच एकट्याने, वाटे गाठले स्वत:ला ॥ २ ॥

असा गेला ना वेळ, कधी एकटेच बसण्यात
करू लागलो विचार, काय तथ्य एकलेपणात ॥ ३ ॥

राहण्यात एकटे असेल, काय वेगळी बात?
चंद्र; सूर्य ऐसेच का, विशाल नभी शोभतात ॥ ४ ॥

एकलीच येतात माणसे, एकलीच जातात
परी जोडीदारासवेत, सारे आयुष्य घालवतात ॥ ५ ॥

कशी थोर माणसे, एकलेपणास जिंकतात
उगाच काय त्यास, विचारवंत म्हणतात ॥ ६ ॥

म्हणोनीच काय एकटा, देव राहतो देवळात
असेल मिळत त्यास, देवपण एकलेपणात ॥ ७ ॥

आज मी ही बसलो, हा काय विचार करत
सुचले नेमके हेच, मला आज एकटेपणात ॥ ८ ॥

© सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com
sachin.kulkarni78@gmail.com